ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 9 | MAY - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# बहुजन समाज उद्धारक शाहू महाराज

प्रा. देवकाते बी.एन.
इतिहास विभाग प्रमुख , एस.एम.जोशी कॉलेज, हडपसर, पुणे.

## प्रास्ताविक :



महाराष्ट्रात १९ व्या शतकात समाज प्रबोधनाचे युग सुरू झाले. समाजात अंधश्रद्धा, रूढी परंपरा, जातीय विषमता मोठ्या प्रमाणात होती. समाज अनेक बंधनामध्ये अडकलेला होता. याचवेळेस न्यायमुर्ती रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, ईश्वरचंद्र विद्यासागर, विष्णूशास्त्री चिपळूणकर, राजा राममोहन रॉय, म. फुले, महर्षी शिंदे, राजर्षी शाहू महाराज या समाज सुधारकांची एक फळी निर्माण झाली. त्यांनी आपल्या लेखणीने, वाणीने समाज प्रबोधन घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानची अधिकार सूत्रे हाती घेण्यापूर्वी संस्थानांचा दौरा करून तेथील राज्यव्यवस्था प्रजेच्या स्थितीची बारकाईने पहाणी केली. प्रजा हालाखीचे जीवन जगत होते. हे चित्र त्यांना दिसले. आणि ठरविले की, प्रजेच्या कल्याणासाठीच माझ्या सत्तेचा उपयोग करण्याचा दृढ निश्चय केला. पददलित मागासलेल्या वर्गांची उन्नती करणे हे शाहू महाराजांनी आपले जिवीत कार्य मानले होते. शिक्षणाशिवाय तरूणोपाय नाही हे ओळखून करवीर तालुक्यातील चिखली या गावी प्राथमिक शिक्षण मोफत देणारी शाळा सन १९१८ रोजी सुरू केली. या प्रजाहितदक्ष राजाने भारतात लोकशाही स्वराज्य हवेच पण त्याअधी ते उपभोगण्यासाठी व राबविण्यासाठी प्रथमत: जनतेमध्ये पात्रता यावयास हवी. यासाठी बहुजन समाजामध्ये जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने प्रेरीत होऊन वेदोक्तद प्रकरणानंतर शाहू महाराज आपल्या सामाजिक कार्याकडे वळाले. या अस्पृष्ट समाजाचे निवारण करण्याचा ध्यास घेतला.

शाहू महाराज नुसते राजे नव्हते तर ते सर्व सामान्य लोकांचे पूजक होते. महाराष्ट्रात सन १८९६ मध्ये मोठा दुष्काळ पडला होता. गावेच्या गावे ओस पडू लागली होती. जीव वाचविण्यासाठी लोक इकडे तिकडे सैरावैरा पळू लागली होती. चारापाणी नसल्यामुळे गुरेढोरे मरू लागली. याची चाहूल कोल्हापूर संस्थानात लागताच अंमलदाराकडून शाहू महाराजांनी दुष्काळी भागाची पहाणी करून अहवाल मागविला. गडहिंग्लज, रायबाग, कटकोळ इत्यादी दुष्काळी भागाचा दौरा करून गावातील लोकांना अन्न मिळावे यासाठी पाटलांकरवी सर्वसामान्य जनतेकडून धान्य गोळा केले. आणि दुष्काळग्रस्त लोकांना वाटण्यासाठी स्वस्त धान्य दुकाने सुरू केली. त्यासाठी कर्नाटक, म्हैसूर येथून धान्य आयात केले. मातब्बर शेतकरी, व्यापारी व दरबार या तिघांच्या संमतीतून मार्ग काढला. पाण्याचा बिकट प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी नदीकाठी विहीरी खोदल्या, तलाव बांधले. इत्यादी दुष्काळी कामे सुरू केली.[१]

शेतकऱ्यांबरोबरच नोकरदार वर्गांवर देखील लक्ष होते. या वर्गाला दुष्काळी भत्ता देऊन खूश केले होते. याची सांगड त्यांनी जोंधळ्याच्या दरासी घातली होती. जेवढ्या प्रमाणात जोंधळ्याच्या दरात वाढ होईल तेवढ्या प्रमाणात भत्त्यात वाढ केली जाईल असे फर्मान काढले. दुष्काळावार मात करण्यासाठी अनेक उपाय योजना केल्या गेल्या. त्याचा फायदा लोकांना झाला. परंतु मुंबई इलाक्यातील दुष्काळात मोठ्या प्रमाणात भूकबळी झाली. मात्र संस्थानात एकही भूकबळी गेला नाही. याचे सर्व श्रेय शाहू महाराज यांना जाते. करवीर नगरी प्लेगच्या विळख्तात आडकली होती. एकतीस हजार एकशे एकवीस

लोक या प्लेगच्या रोगाने हैराण झाले होते. प्लेगचे निवारण व्हावे यासाठी हॉस्पीटल उघडली. प्लेग रोग आटोक्यात आणण्यासाठी लोकांना गाव सोडून रानोमाळ वस्त्या करून रहावे असा आदेश करवीर नगरीत काढण्यात आला. मोक्याच्या ठिकाणी क्राईटाईन बसविण्यात आले. ये–जा करणाऱ्या लोकांची वैद्यकीय तपासणी होऊ लागली. कोटीतीर्थाजवळील एका गावात हॉस्पिटल उघडून तेथे वैद्यकीय अधिकारी म्हणून डॉ. दोमानजी दोराबजी यांची नियुक्ती केली होती. परिचारिका, आया, याकामासाठी राजर्षी शाहू महाराजांनी नोकरदार वर्गाची नियुक्ती केली. अशा प्रकारे प्लेग्या निवारणासाठी शाहू महाराजांनी भास्करराव विठोजी जाधव यांची खास नेमणूक केली होती. त्याचबरोबर अस्पृश्यांना शिक्षण मिळावे यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी वसतिगृहाची स्थापना करण्यात आली. न्या. रानडे, गोपळ कृष्ण गोखले या विचारवंतांच्या सहकार्यातून मराठा वसतिगृहाची स्थापना करण्याचा संकल्प केला. राजर्षी शाहू महाराज हे डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष होते. शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या. राजप्रतिनिधी सर डब्ल्यू टी मॉरिसन यांच्या शुभहस्ते १८ एप्रिल १९०१ रोजी मराठा वसतिगृहाचे उद्घाटन करण्यात आले. पुढे या वसतिगृहाचे नामकरण 'महाराणी व्हिक्टोरिया' मराठा बोर्डिंग इन्स्टियूट असे करण्यात आले. आबासाहेब यांना महाराणीने सन्मानाने वागविले होते. शाहू महाराज 'महाराज' ही पदवी त्यांनीच दिली होती. तसेच सर्वसामान्य जनतेला शिक्षणाची दालने खुली करून दिली. या वसतिगृहात मुसलमान विद्यार्थ्यांना संधी मिळावी असा आदेश शाहू महाराजांनी १९०८ साली काढला होता. १९१३–१४ च्या अहवालानुसार वसतिगृहात गवळी, माळी, कोळी, धनगर इत्यादी जातीचे विद्यार्थी शिक्षण घेत होते. केवळ ९ ते १० विद्यार्थ्यांवर सुरू झालेल्या वसतिगृहात १९२२ ला ९२ विद्यार्थी रहात होते. जाति निरपेक्षतेचे उदाहरण पाहण्यासाठी राजा स्वत: वसतिगृहाला भेट देत असत.

राजर्षी शाहू महाराजांनी मराठा वसतिगृहाबरोबरच जैन वसतिगृहाची स्थापना झाली. निपाणी जवळील स्तवननिधी तीर्थाच्या ठिकाणी जैन धर्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. याठिकाणी शाहू महाराजांच्या आदेशानुसार रायबागचे पाटील यांना पाठविण्यात आले होते.[२] सभेत कोल्हापूरात जैन वसतिगृह उभारण्याचा निर्णय झाला. इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत जैन मंदिरात वसतिगृह सुरू करण्यात आले. दक्षिण महाराष्ट्र जैन सभेच्या प्रेरणेतून हे वसतिगृह चालविले जात असत. ६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. शाहू महाराजांनी व्हिक्टोरिया मराठा वसतिगृहासमोरील चौफळामाळ म्हणून ओळखली जाणारी जागा दक्षिण महाराष्ट्र जैन सभेच्या वसतिगृहासाठी देण्यात आली. परंतु मराठ्यांनी याला कडाडून विरोध दर्शविला. मात्र शाहू महाराजांनी मराठ्यांना स्पष्ट शब्दात सांगितले की, 'मी केवळ मराठ्यांचा राजा नव्हे तर साऱ्या जनतेचा राजा आहे'. अशा आशयाचे पत्र राजनैतिक प्रतिनिधी यांना पाठवून हा वाद मिटविला. यावरून शाहू महाराजांचा समता न्यायीक विचार दिसून येतो. १९०८–९ पासून मुलींसाठी वेगळा विभाग सुरू करून या विभागात 'श्रमिकाश्र' असे नाव देण्यात आले. यात १६ विद्यार्थीनी होत्या. त्यातील दोन विद्यार्थीनी युरोप खंडातील इटली या देशात पाठविण्यात आल्या होत्या. जैन धर्मीयातील परदेश गमनाचे पहिले उदाहरण म्हणता येईल.

राजर्षी शाहू महाराज विलायतेहून परत आल्यावर मुस्लीम समाजाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याचवेळी शाहू महाराजांनी मोहमेडन समाजातील लोकांना शिक्षणाशिवाय तरूणोपाय नाही असे स्पष्ट केले. जर मुसलमान समाज विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह काढण्याचा विचार करील तर आपण त्यास सर्वोत्तपरी साहय्य करू असे जाहिरपणे अभिवचन दिले. मुसलमान समाज हा मागासलेला आहे. शिक्षणाशिवाय पर्याय नाही. मुस्लीम बांधव शिकल्याशिवायय समाज संघटन व वसतिगृह स्थापन करणे शक्य नाही. शाहू महाराजांनी व्हिक्टोरिया व मराठा वसतिगृहात दहा मुसलमान विद्यार्थ्यांना वसतिगृह स्थापन होईपर्यंत मोफतद प्रवेश देण्याची राजज्ञा काढली. ब्रिटिश हद्दीतील कानडी प्रदेशातील अथणी गावचा एक मुसलमान मुलगा शेख युसुफ अब्दुला खान पुढे मामलेदार, प्रांतसाहेब, ट्रेझरी, ऑफिसर आणि शेवटी असिस्टंट दिवाणही झाला. शाहू महाराजांनी शेख अब्दुलावर मुसलमान समाजाचे संघटन करून शिक्षणाभिमुख करण्याची कामगिरी सोपविली. १५ मे १९०६ रोजी 'दि मोहमेडन एज्युकेशन सोसायटीची' स्थापना झाली. या वसतिगृहासाठी कोल्हापूरातील दसरा चौकालगत २५००० चौरस फूटाची जागा त्यांना दिली. तसेच या वसतिगृहाच्या इमारतीस फंडास ५५००/–

रूपयांची देणगी देण्यात आली. तसेच वार्षिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या जमिनीही दान देवून टाकल्या. संस्थेस दोनशे पन्नास रूपये वार्षिक अनुदानही मंजूर करण्यात आले. अल्पसंख्यांकविषयी शाहू महाराजांची कनवाळू वृत्ती दिसून येते.

फेब्रुवारी १९०७ मध्ये कोल्हापूर जवळील सिद्धगिरी या ठिकाणी लिंगायत परिषद भरली होती. या परिषदेस शाहू महाराज आवर्जुन उपस्थित होते. एववढेच नव्हेतर त्यांनी वसतिगृह काढण्याबाबत कळकळीचे आवाहन केले. या आवाहानाचा लिंगायत लोकांवर एवढा परिणाम झाला की, या परिषदेस लिंगायत वसतिगृह स्थापनेचा निर्णय घेण्यात आला. रंकाळा तलावाच्या पश्चिम तीरावर गोलकर बंगला राजर्षी शाहू महाराजांनी लिंगायत सोसायटीला दिला. अशा प्रकारे वीर शैव लिंगायत वसतिगृह १९०७ साली सुरू झाले. आणि या वसतिगृहात १६ विद्यार्थी होते. कोल्हापूर म्हणजे विद्यार्थी वसतिगृहाची माता असे संबोधण्यात राजर्षी शाहू महाराजांना आनंद व अभिमान वाटत होता. मागासलेल्या समाजात उच्च शिक्षणाविषयी आस्था निर्माण करण्याची एक महत्वाची उपाय योजना होती. व ती म्हणजे उच्च शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या गरजू गरीब विद्यार्थ्यांसाठी १९०८ साली 'मिसक्लार्क' होस्टेलची स्थापना करण्यात आली. जैन बोर्डिंगचे रेक्टर आण्णासाहेब लट्ठे यांच्या अध्यक्षतेखाली १४ फेब्रुवारी १९०८ रोजी विद्याप्रसारक मंडळ नावाची संस्था स्थापन झाली. राजर्षी शाहू महाराजांच्या इच्छेप्रमाणे वसतिगृह काढण्याचे ठरले. या कार्यासाठी भास्करराव जाधव, महादेव डोंगरे, गणपतराव कदम, खंडेराव बागल यांनी बोर्डिंगच्या स्थापनेच्या वेळी व पुढे बरेच परिश्रम घेतले. बोर्डिंगला २०० x १५० जंगम खोल्यांच्या इमारतीसह दिली. आणि दरमहा ५५ रूपये ग्रँट देखील चालू केली. मुंबर्स इलाख्याचे गव्हर्नर जॉर्ज क्लार्क यांच्या कन्या मिस व्हायलेट क्लार्क अस्पृश्यता निवारणासाठी प्रयत्न करीत होत्या. होस्टेलच्या मदतीसाठी त्यांनी नृत्यांचा कार्यक्रम करून ५००० रूपयांची रक्कम गोळश केली होती. कुमारीकेचा मानवतावादी दृष्टीकोन पाहून राजर्षी शाहू महाराजांनी तिचे होस्टेलला नाव दिले.[३] शाहू महाराजांच्या मृत्यूसमयी २२ विद्यार्थी या वसतिगृहाचा फायदा घेत होते. १९२२ च्या अहवालात संस्थेच्या उद्देशात दलित वर्गासाठी दलितातूनच सुशिक्षित आणि सुधारणावादी पुढारी निर्माण व्हावेत असाही उद्देश होता. इतर मागास वर्गातील वसतिगृहांना अनुकरणीय व पुरक आहे. दत्तोबा संताराम पोवार हा बोर्डिंगज्ञधील विद्यार्थी कोल्हापूर नगरपालिकेच्या स्थायी समितीचे चेअरमन होते.

शाहू महाराजांनी इतर समाजासाठी वसतिगृहाची स्थापना केली. दैवज्ञ शिक्षण समाजाची स्थापना १४ डिसेंबर १९०८ मध्ये केली. शिंपी समाजातील विद्यार्थ्यांसाठी २ एप्रिल १९११ रोजी श्री. नामदेव वसतिगृहाची स्थापना करण्यात आली. कायस्थ प्रभू समाजाचे रावबहाद्दूर रघुनाथ व्यंकोजी, सबनीस, चंद्रसेन कायस्थ प्रभू समाजाचे वसतिगृह, १९१८ ला ढोर, चांभार वसतिगृह १९१९ शिवाजी वैदिक वसतिगृह (६ जुलै १९२०), आर्यक्षत्रिय, जिनगर, विद्यावर्धक समाजाचे वसतिगृह (१९२०), श्री प्रिन्स शिवाजी मराठा फ्री बोर्डिंग हाऊस (१ जुलै १९२०) यासारखी प्रत्येक जातिधर्माची वसतिगृहे कोल्हापूर शहरात झाली.[४] त्यातूनच शैक्षणिक विकास घडवून आणण्याचा शाहू महाराजांनी प्रयत्न केला.

मागासलेल्या जातीजमातीच्या लोकांसाठी पन्नास टक्के राखीव जागा ठेवण्याचा महत्वाकांक्षी निर्णय २६ जुलै १९०२ रोजी घेवून तो प्रत्यक्ष राबविण्यास सुरूवात केली. राखीव जागांचा जाहीरनामा काढणारा हा पहिला दूरदृष्टीचा राजा म्हणावा लागेल. ब्राह्मण, प्रभू, शेणवी, पारशी या जातींना आरक्षण नव्हते. मात्र इतर जमातींना आरक्षण राखीव जागा देण्यात आल्या होत्या.[५] कोल्हापूर संस्थानातील धर्मकारण. प्रशासनात ब्राह्मण वर्गांचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. त्याच्या धार्मिक, ऐहिक वर्चस्वाला शाहू महाराजांनी शह देण्याचे ठरविले. जाहिरनाम्याच्या विरोधात विजापूरकरांचे समर्थपत्रक, लो. टिळकांचे केसरी पत्रकावर टिका होऊ लागली. लो. टिळक केसरीमधून म्हणतात की, हजारो रूपये खर्च केले तरी त्याला मराठी पत्राचा विरोध नाही. तथापि एकाच जातीच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणे याला आमचा विरोध असेल असे ठणकावून सांगितले.[६] अस्पृश्य लोकांचा उध्दार व्हावा यासाठी शाहू महाराजांनी शैक्षणिक कार्याच्या माध्यमातून त्यांनी सर्व जातीजमातीसाठी शाळा उघडल्या. वसतिगृहाची निर्मिती केली. अस्पृश्य लोकांसाठी अनेक सवलती देवून आदेशांची अंमलबजावणी करून बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला.[७] अस्पृश्यांना मोफत शिक्षण, अस्पृश्यता निवारणाचे कार्य, गुलामगिरी पद्धत, हजेरी वेठबिगारी पद्धत बंद, महार वतन खालसा केली. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक

विषमता नष्ट करून सामाजिक समता स्थापण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये प्रामुख्याने अस्पृश्यता वर्गाचा उद्धार केल्याचे दिसून येते.

## सारांश :

एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक विषमता मोठ्या प्रमाणात होती. बहुजन समाज अंधकारात चाचपडत जीवन जगत होता. शिक्षणापासून वंचित होता. शिक्षणाची दारे खुली केल्याशिवाय त्यांचा सामाजिक, आर्थिक स्तर उंचावणार नाही  हे ओळखून शाहू महाराजांनी वसतिगृहाच्या रूपाने वेगवेगळ्या जातीजमातींच्या मुलांसाठी वसतिगृह सुरू केली. दुष्काळाची चाहूल लागताच शाहू महाराजांनी म्हैसूर, कर्नाटक येथून धान्य गोळा करून स्वस्त धान्याची दुकाने उघडली. त्याचबरोबर पाण्याचा प्रश्न सुटावा यासाठी नदीच्या काठी विहरी, तलाव बांधले. शेतकऱ्याबरोबर नोकरदार वर्गाला देखील दुष्काळी भत्ता देऊन खुष केले.

प्लेगचा रोग आटोक्यात आणण्यासाठी दवाखाने उघडून डॉ. अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या. कोल्हापूरातील करवीर नगरीत वेगवेगळ्या जाजिमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू  केले. मागासलेल्या या वर्गाला राखीव जागा ठेवून त्यांना आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सक्षम केले.

## तळटीप :

१) ठोंबरे तानाजी,महर्षी वि.रा.शिंदे यांच्या राजकीय व सा. चळवळी,लोकवाङ्मयगृह मुं.फेब्रु. २००९.
२) सूर्यवंशी कृ. गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन पुणे फेब्रु. १९८४. पृष्ठ ११७, १२४
३) कित्ता, पृष्ठ १२७, १२८
४) कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती एक समाजक्रांतीकारक राजा,पॉप्युलर प्रकाशन मुं.२०११ पृष्ठ ११४
५) मुलाखत, मुजावर मुस्ताफ चाँदसो. सिनियर लिपीक मोहमेडन मुस्लीम बोर्डिंग कोल्हापूर
६) कोल्हापूर संस्थान प्रशासकीय अहवाल १९१२, १३ पृष्ठ ३
७) मुलाखत कांबळे राजाराम वसंत, अधिक्षक श्री. इंदूमती विद्यार्थी वसतिगृह कोल्हापूर
८) मुलाखत विणकरे सुधाकर संभाजी, अधिक्षक मिस क्लार्क होस्टेल कोल्हापूर
९) साळुंखे नानासाहेब, शाहूच्या आठवणी, कृष्णा प्रकाशन कोल्हापूर २०१२